# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे कार्यालय, पोलीस स्कुल समोर,
खारकर आळी, कोर्ट नाक्या जवळ, ठाणे
e-mail : sp.thane.r@mahapolice.gov.in
दुरध्वनी :- 022-25343567


---

**प्रेसनोट** दिनांक : ०५/१०/२०१८

**"सोनसाखळी चोरी करणाऱ्या चोरटयांकडुन लाखो रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने व चोरीच्या मोटार सायकली हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणला यश"**

ठाणे ग्रामीण जिल्हयातील चैनस्नॅचींग व मोटार सायकल चोरींच्या घटनांचे प्रमाण लक्षात घेवून ठाणे ग्रामीणचे मा. पोलीस अधिक्षक डॉ. श्री शिवाजी राठोड साो., मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री संजयकुमार पाटील साो यांनी स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण यांना सदरचे गुन्हे उडघकीस आनणेकरीता आदेशित केले त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री व्यंकट आंधळे यांनी शहापुर-भिवंडी युनिटचे सपोनि संदिप निगडे व कर्मचारी यांना सदरचे गुन्हे उघडकीस आणनेबाबत मार्गदर्शन व सुचना केल्या.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा सदर गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना पो.उप निरीक्षक बजरंग राजपुत यांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे, खर्डी शहापुर परीसरात राहणारा कुंजल गोकुळ सांडे हा व्यक्ती शहापुर, भिवंडी या परीसरात व आजुबाजुचे परीसरात त्याचे मित्रासंह चैनस्नॅचींग व मोटार सायकल चोरी करतो अशी माहीती मिळाली त्याप्रमाणे त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे व त्याचे साथीदाराकडे कसुन विचारपुस करता त्याने त्याचे इतर मित्रांसह शहापुर, वासिंद, पडघा, भिवंडी, गणेशपुरी परीसरात चैनस्नचींग व मोटार सायकल चोरी केल्याचे कबुली देवुन त्यांनी शहापुर, वासिंद, पडघा, भिवंडी, गणेशपुरी पोलीस स्टेशनचे अभिलेखावर खालीलप्रमाणे दाखल गुन्हे केल्याचे निष्पंन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि. क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | पडघा पोलीस स्टेशन | I ११४/२०१८ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| २. | वासिंद पोलीस स्टेशन | I ८३/२०१८ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ३. | शहापुर पोलीस स्टेशन | I ३२२/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ४. | गणेशपुरी पोलीस स्टेशन | I ९८/२०१८ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ५. | भिवंडी तालुका पोलीस स्टेशन | I १०४/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ६. | गणेशपुरी पोलीस स्टेशन | I ६९/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ७ | कल्याण तालुका पोलीस स्टेशन | I ३८४/२०१८ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ८ | कल्याण तालुका पोलीस स्टेशन | I ३८५/२०१८ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ९ | वाडा पोलीस स्टेशन ( जि. पालघर ) | I १८/२०१८ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |

आरोपीत १) **गुंजल गोकुळ सांडे वय २१ वर्ष रा. बागेचापाडा, पो. खर्डी, ता. शहापुर व त्याचे इतर साथीदार २) गोविंद उर्फ पप्या दत्ता धमके, वय २७ वर्ष रा शहापुर ३) विजय मार्तंड सातपुते वय २५ वर्ष रा. शहापुर यांना पडघा पोस्टे गुन्हा रजि नं. I ११४/२०१८ भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे या गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांचेकडुन नमुद व इतर गुन्हयातील असा एकुण १९० ग्रॅम वजनाचे (१९ तोळे ) सोन्याचे दागीने व त्याचे इतर साथीदार यांचेकडुन ४ मोटार सायकली (१,९०,०००/- रु किंमतीच्या) असा एकुन ७,१३,८००/- रुपयांचा माल हस्तगत** करण्यात आला आहे.

ठाणे ग्रामीणचे मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. शिवाजी राठोड, मा. अप्पर पोलीस अधिक्षक साो, श्री संजयकुमार पाटील यांचे आदेशान्वये आणि स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री व्यंकट आंधळे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि संदिप निगडे, पोउनि बजरंग राजपुत, पोहवा रविंद्र चौधरी, कमलाकर कशिवले, सुनिल कदम, गोरक्षनाथ मुंढे, महादेव खोमणे, धनाजी कडव, पोना अमोल कदम, हनुमान गायकर, उमेश ठाकरे, दिपक गायकवाड, सतीश कोळी, अजय सपकाळ,राजेश डोंगरे व पोशि रवि राय यांनी अथक परीश्रम घेवून सदर आरोपीतांना अटक केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउनि बजरंग राजपुत हे करीत असुन, सदर आरोपीतांची दिनांक ०५.१०.२०१८ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे कार्यालय, पोलीस स्कुल समोर,
खारकर आळी, कोर्ट नाक्या जवळ, ठाणे
e-mail : sp.thane.r@mahapolice.gov.in
दुरध्वनी :- 022-25343567

